महाराष्ट्र टाइम्स

शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०१५

# वसुंधरा संवर्धनासाठी सायकल रॅली

**चार दिवसीय महोत्सवाला सुरुवात, ५०० विद्यार्थ्यांचा सहभाग**



**म. टा. वृत्तसेवा, जळगाव**

'पर्यावरण वाचवा आणि पर्यावरण संवर्धन'साठी जगजागृती व्हावी याकरीता पर्यावरण शाळा, रोटरी क्लब ऑफ जळगाव, गांधी रिसर्च फाऊंडेशन आणि इंडियन इंन्स्टीट्यूट ऑफ आर्किटेक्ट तसेच शहरातील विविध पर्यावरणवादी संस्थेतर्फे १२ ते १५ फेब्रुवारी दरम्यान वसुंधरा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाची सुरूवात गुरूवारी सकाळी सायकल रॅलीने करण्यात आली. आपली वसुंधरा म्हणजेच पृथ्वी हिरवी राहिली तरच आपले आयुष्य आनंद आणि आरोग्य निरोगी राहील असा संदेश यावेळी देण्यात आला.

सायकल रॅलीला यावल वन विभागाचे उपवन संरक्षक पी. एन. पाटील यांनी हिरवी झेंडा दाखवून उद्घाटन केले. यावेळी पोलिस अधीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर यांच्यासह शहरातील मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे डॉ. सुपेकर हे सायलकीसह उपस्थित होते. त्यांनीही सायकल चालवून रॅलीत सहभाग नोंदविला. सायकल रॅली ही काव्यरत्नावली चौकातून आकाशवाणी चौक, स्वातंत्र चौक, सावरकर चौक, एस. टी. स्टॅन्ड, एसबीआय चौक, आर. आर. विद्यालयाच्या रस्त्यावरुन कांताई सभागृहाकडे मार्गस्थ झाली. कांताई सभागृहात रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅलीत ५०० विद्यार्थी आणि १५० कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला होता. महोत्सवांतर्गत सकाळी ११ वाजता आयएमआर महाविद्यालयाच्या सभागृहात वाईल्ड लाईफ फोटोग्राफीवर पुण्याचे वाईल्ड लाईफ फोटोग्राफर युवराज पाटील यांनी कार्यशाळा घेतली. यावेळी त्यांनी फोटोग्राफी करतांना घ्यावयाची काळजी आणि कॅमेऱ्याची सेटींग या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. युवराज पाटील कार्यशाळेत कॅमेऱ्याच्या लेन्स, लाईट, शेड या विषयी मार्गदर्शन करतांना कॅमेऱ्याचा आयएसओ कमी जास्त केल्यास फोटोवर काय परिणाम होतो याचीही सविस्तर माहिती दिली. तसेच कमी आणि जास्त आयएसओ असलेले छायाचित्र पावर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे दाखवून फरक स्पष्ट करून दाखविला. याप्रसंगी त्यांनी काढलेल्या छायाचित्रांविषयीचे अनुभव कथन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित किरण बच्छाव यांनीही त्यांच्या वाईल्ड लाईफ फोटोग्राफी विषयीचे अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमाप्रसंगी सभागृहात विरेंद्र चितराव, शैलेंद्र महाजन यांच्यासह फोटोग्राफीचा छंद असलेले सर्व उपस्थित होते.



## आजचे कार्यक्रम

- सकाळी ६ ते ८ या वेळेत लांडोरखोरी येथे नेचर वॉक
- सकाळी ११ वाजता सिग्निफीकन्स ऑफ झिरो वेस्टवर कार्यशाळा, स्थळ - गुलाबराव देवकर कॉलेज
- कार्यशाळेत पुण्याचे आर्किटेक्ट गिरीश देशमुख आणि विनोद बोधनकर हे मार्गदर्शन करतील.
- सकाळी १० ते १२ - शहरातील विविध कॉलेजमध्ये पर्यावरण आणि वाईल्डलाईफ वर आधारीत डॉक्यूमेंटरी
- सायंकाळी ६.३० ते ८.३० - डॉक्युमेंटरीचे पुनःप्रसारण, ठिकाण- कांताई सभागृह.